प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १६.०६.२०२१**

**वंडर्स पार्क उद्यानालगत सायन्स पार्क उभारण्यासाठी सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेला भूखंड देण्यात येणार**

सिडको महामंडळाने नवी मुंबईतील नेरूळ येथील वंडर्स पार्क उद्यानाच्या भूखंडाची पोटविभागणी (सबडिव्हिजन) करून, विभाजित केलेला भूखंड हा नवी मुंबई महानगरपालिकेला सायन्स पार्क विकसित करण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला आहे.

**"नवी मुंबईच्या पायाभूत विकासाबरोबरच शहराचा सामाजिक व सांस्कृतिक विकास साधण्यास सिडकोने नेहमीच प्राधान्य दिले आहे. यांस अनुसरून, वंडर्स पार्क अंतर्गत सायन्स पार्कच्या उभारणीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेला भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सायन्स पार्कसारख्या प्रकल्पामुळे सांस्कृतिक प्रगतीबरोबरच विज्ञानविषयक दृष्टीकोन व जाणीव विकसित होण्यास मदत होणार आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोने सेक्टर-१९ए, नेरूळ येथील भूखंड क्र. ५० हा नवी मुंबई महानगरपालिकेला चिल्ड्रन्स थिम पार्क विकसित करण्याकरिता भाडेकराराने दिलेला होता. त्यानुसार, नवी मुंबई महानगरपालिकेने या भूखंडावर वंडर्स पार्क उद्यान विकसित केले आहे. त्यानंतर, नवी मुंबई महानगरपालिकेने वंडर्स पार्कमधील ३.४ हेक्टर क्षेत्रावर सायन्स पार्क उभारण्याची परवानगी देण्याची विनंती सिडकोकडे केली. यानुसार सिडकोकडून काही अटींवर, २.०० हेक्टर क्षेत्रावर सायन्स पार्क उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. सायन्स पार्क विकसित करण्याकरिता सदर भूखंड क्र. ५० ची भूखंड क्र. ५० व ५०ए अशी पोटविभागणी करण्यात येणार आहे. वापर बदल करून ५०ए हा २.०० हेक्टरचा भूखंड नवी मुंबई महानगपालिकेस सायन्स पार्क विकसित करण्याकरिता हस्तांतरीत करण्यात येणार आहे. या भूखंडाकरिता अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक १.०० असणार आहे.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**